INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

October-November-December-2021 E-ISSN – 2348-7143


International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY


International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.-8, Issue-4



## Recent Trends in Research




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

October-November-December-2021 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.-8, Issue-4

# Recent Trends in Research

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** https://indianexpress.com/article/india/narendra-modi-twitter-picture-india-100-crore-doses-covid-vaccination-7584303/

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

# Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV's Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S. -** Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva -** Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju –** Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar -** BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar -** Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik -** Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh -** Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi -** Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare -** Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur -** Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar -** M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | The Use of Symbols and Imagery in Rabindranath Tagor's Selected Short Stories | Dr. Abdul Anees Abdul Rasheed, Mrs. Kavita Kakhandki | 06 |
| 2 | Rethinking Multiculturalism : An Overview | Dr. T. M. Inamdar | 11 |
| 3 | A Study of Ambivalence in Aravind Adiga's '*Selection Day*' | Dr. N.Gunasekaran, Mrs. K.S. Shyalaja | 14 |
| 4 | Power and Solidarity in Literary Discourse | Dr. Prabhakar Hapse | 17 |
| 5 | The Myth of *Yavakri* in Girish Karnad's *'The Fire and the Rain'* | Dr. Sandeep Wagh | 20 |
| 6 | Intertextuality in Jean Rhy's '*Wide Sargasso Sea*' | Dr. Mahadev Waghmode | 23 |
| 7 | Gender Inequality in Nayantara Sahgal's *'Storm in Chandigarh'* | Dr. N. Gunasekaran, R. Santhi | 26 |
| 8 | The Role of India Tourism Development Corporation (ITDC) | Dr. Mahendra Agale | 31 |
| 9 | Rain Water Harvesting and Watershed Management of Dhora Basin in Ahmednagar District | Prof. Baban Avhad, Dr. R. D. Davankar | 35 |
| 10 | Studies on Antifungal Properties of Freshwater Fish Skin Mucus | D. K. Hiwarale | 41 |
| 11 | Impact of Covid-19 on Agriculture Sector : Study of Ahmednagar Distirct | Dr. Maruti Kekane | 45 |
| 12 | State Wise Imbalances in the Growth of Area and Production of Sugarcane Crops in India | Dr. B. S. Salunkhe | 49 |
| 13 | A Study of the Care of Reading Materials in Ratnagiri District College Libraries | Dr. Rajesh Rajam | 52 |
| 14 | Library Automation in City College Libraries of Jalgaon, Dhule and Nandurbar | Ratneshwar Bhavsar, Dr. Anil Chikate | 59 |
| 15 | A Critical Study of Performance Management in Union Bank of India, Nagpur | Dr. Sameer Kuduple | 70 |
| 16 | Pandit Nehru Pancheel, Peaceful & 21 Centure World | Dr. Pramod Sardar | 81 |
| 17 | The Impact of' Non-Verbal Communication in the Class | Dr. Balasaheb Yadav | 83 |
| 18 | A Study of Self-Confidence among Tribals and Non-Tribals College Students | Dr. J. P. Sontakke, Mr. Samadhan Patil | 89 |
| 19 | Visual Representation of the Ideal Method of Teaching in Marathi Movie 'Ubuntu' | Mr. Vaibhao Waghmare | 95 |
| 20 | Studies of Microbial Fauna on Fish Skin Mucus of Channa Punctatus (Murrel) | D. K. Hiwarale | 97 |
| 21 | Scenario of Rural Household Distribution and Household Size in Dhule District | Mr. Chaitanya Nikam, Dr. Jaydev, Dr .S. B. Patil | 102 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 22 | भारतीय आचार्यो द्वारा प्रस्तुत काव्य लक्षण | डॉ. मधुकर राठोड़ | 108 |
| 23 | 'शकुंतला' महाकाव्य में अभिव्यंजित 'भारतीय संस्कृति' | डॉ.विश्वनाथ महादू देशमुख | 113 |
| 24 | 'मंगल भवन'उपन्यास में ग्राम जीवन का चित्रण | प्रो. देविदास बामणे | 118 |
| 25 | मैत्रेयी पुष्पा के उपन्यासों में चित्रित नारी चितन | डॉ. डी. बी. महाजन | 126 |

| | | | |
|---|---|---|---|
| 26 | दशम् दशक के हिंदी उपन्यासों में अस्पृश्यता | डॉ. सन्मुख मुच्छटे | 130 |
| 27 | लोकऋण उपन्यास की कथावस्तु का अनुशीलन और समस्याएँ | डॉ.देविदास बामणे | 135 |
| 28 | मनोज सोनकर के काव्य में चित्रित सामाजिक सरोकार | डॉ. ज्ञानेश्वर महाजन | 140 |
| 29 | वेदकुमार वेदालंकार : हिंदी अनुवाद में योगदान | प्रा. शुभांगी खुडे | 143 |
| 30 | मृदुला सिन्हा की कहानियों में आधुनिकतावाद | डॉ.दीपाली गुम्मे | 146 |
| 31 | हमारा संविधान हमारा सम्मान | डॉ. मीना ठाकूर | 152 |
| 32 | 'नीला आकाश'की नायिका पर अम्बेडकरवादी विचारों का प्रभाव | सायली डोळस, डॉ. मधुकर राठोड | 155 |
| 33 | जल, कृषी, स्वास्थ्य, सामाजिक जीवन, औद्योगिक क्षेत्र के विकास में पर्यावरण का प्रभाव | डॉ.मीना ठाकूर | 158 |
| | **मराठी विभाग** | | |
| 34 | उखाणा : लोकसाहित्य प्रकारातील लोकसंस्कृतीचे दर्शन | डॉ. किरण पिंगळे | 162 |
| 35 | लोकसाहित्याची सामाजिकता | डॉ. मीनाक्षी पाटील | 167 |
| 36 | मराठी-कोकणी भाषा : सांस्कृतिक परिचय | प्रा.प्राची जोशी | 171 |
| 37 | ग्रामदैवतांचे पौराणिक महत्त्व | प्रा .सुनील जाधव | 180 |
| 38 | डांगी लोकसाहित्यावर मराठी भाषेचा प्रभाव | गिरीष गायकवाड | 184 |
| 39 | संत चोखामेळा आणि संत रविदास यांच्या रचनेतील अस्पृश्यतेच्या जाणीवा | डॉ. भा. ना. गाडेकर | 187 |
| 40 | संत एकनाथांच्या भारूडांतील लोकदेवताविषयक लोकतत्त्वे | स्वाती लवंगे, डॉ. दिलीप पवार | 194 |
| 41 | भटक्यांच्या वेदनेची गाथा : बळी | डॉ. मधुकर बैकरे | 207 |
| 42 | आदिवासी कथा व आत्मकथनाची वाटचाल | डॉ. मोतीराम देशमुख | 213 |
| 43 | पहिले स्त्रीवादी आत्मकथन : *'मला उद्ध्वस्त व्हायचंय'* | डॉ. एस. पी. पैकेकरी | 218 |
| 44 | नजूबाई गावीत यांचे 'नवसा भिलणीचा एल्गार' - एक शोध' | डॉ. विजया पाटील | 221 |
| 45 | अण्णाभाऊ साठे यांचे ऐतिहासिक पोवाडे | डॉ.सुरेश पाथरकर | 227 |
| 46 | अण्णा भाऊ साठे यांचे तमाशातील योगदान | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 231 |
| 47 | कवितेचा अनुवाद | डॉ. बाळासाहेब खोमणे | 237 |
| 48 | 'मृत्युंजय' मधील कर्णचित्रण | सौ. सुषमा जाधव | 241 |
| 49 | १९७५ ते १९९० या कालखंडातील ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप | डॉ. बिभीषण देशमुख | 248 |
| 50 | दलित कविता : असमानता आणि अत्याचाराविरुद्धचा विद्रोह हुंकार | डॉ. राष्ट्रपाल मेश्राम | 256 |
| 51 | लतिका चौधरी यांचे ललित गद्य 'गवाक्ष' : एक आकलन | डॉ. धनराज धनगर | 261 |
| 52 | महात्मा फुले : वाङ्मय आणि कार्य | डॉ. वाल्मिक आढावे | 272 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक तत्वज्ञान | डॉ. जयश्री सरोदे | 277 |


RESEARCH JOURNEY

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 54 | ग्रामीण विकासात सहकारी क्षेत्राची भूमिका | डॉ. गोरखनाथ वाकळे | 283 |
| 55 | लाखनी तालुक्यातील मातीच्या विटा बनविणाऱ्या (मजुरांचा) कामगारांचा अभ्यास | डॉ. सुरेश बन्सपाल | 288 |
| 56 | कोविड-१९ आणि भारतीय कृषीक्षेत्र : स्वरूप व नियोजन | डॉ. विवेक चौधरी | 292 |
| 57 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य | डॉ. राजेंद्र रासकर | 296 |
| 58 | प्राचीन भारतातील शिक्षण व्यवस्था | प्रा. आर. के. सूर्यवंशी | 300 |
| 59 | भारताचे परराष्ट्र धोरण आणि भारत व अमेरिका संबंध | डॉ. विमल राठोड | 303 |
| 60 | सैनिकी आणि शहरी शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये मनमोकळा, उत्तेजीतपणा, मनमौजी आणि कर्तव्यदक्षता या व्यक्तिमत्व घटकांचा अभ्यास | डॉ. दिनेश ढेंगळे | 309 |
| 61 | महाडच्या सत्याग्रहाचे लिंगभावात्मक आकलन | प्रा. किशोर काजळे | 313 |
| 62 | तबकडी भूविवतर्निकी सिद्धांताचा विषय संप्रेषणात्मक अभ्यास | डॉ. एम. पी. पगार | 318 |
| 63 | ग्रंथालयांच्या आर्थिक व्यवस्थापन आणि मनुष्यबळ विकासाच्या समस्या | प्रा. प्रज्ञा देवरे | 322 |
| 64 | मध्ययुगीन सरकार गाळणा : एक दृष्टिक्षेप | प्रा. जितेंद्र पगार | 326 |
| 65 | गडचिरोली जिल्हयातील भामरागड तालुक्यातील माडिया गोंड जमातीच्या राजकीय सहभागाचे अध्ययन | डॉ. गणेश खुणे | 332 |
| 66 | 'महाराष्ट्राची परंपरा' : एक वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 336 |
| | **उर्दू विभाग** | | |
| 67 | محب کوثر: بحیثیت نثر نگار<br>ہندوستان میں جدید غزل گوئی ایک سرسری جائزہ | Dr. Abdur Rahim. A Mulla | 341 |
| 68 | منشی پریم چند کا افسا نہ "کفن" کی حقیقت نگا ری پر تبصرہ- | ڈاکٹر سیّد تا ج ا لہدا محمد یو سف خطیب ، بیلگا وی - | 344 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

# लतिका चौधरी यांचे ललित गद्य ‘गवाक्ष’ : एक आकलन

**प्रा. डॉ. धनराज धनगर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय, येवला
मो. ७७७५९८२५३४

मराठी साहित्यातील एक समृद्ध वाङ्मयप्रकार म्हणून ‘ललितगद्य’ या साहित्यप्रकाराकडे पाहिले जाते. लघुनिबंध, अनुभवकथन, व्यक्तिचित्रणे, प्रवासवर्णने आणि ललित लेख असे काही ललितगद्याचे प्रकार आहेत. फ्रेंच लेखक माँतेन हा या ‘निबंध’ वाङ्मयप्रकारांचा जनक मानला जातो. मात्र मराठी लेखकांना हा वाङ्मयप्रकार इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयाने माहीत झाला. इंग्रजीतील Essay Writing वरून मराठीत निबंध वाङ्मय विकसित झाले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी केलेले वैचारिक लेखन हे या निबंध वाङ्मयप्रकारातील लेखन होते. चिपळूणकरांच्या या निबंधात लालित्यापेक्षा वैचारिकतेला अधिक प्राधान्य दिलेले होते. चिपळूणकरांनंतर, शि. म. परांजपे, न.चि. केळकर यांचा निबंध लालित्याकडे वाटचाल करणारा म्हणावा लागेल. पुढे याच ‘निबंध’ वाङ्मयप्रकारातून, विशेषत: इंग्रजीतील Personal Essay पासून प्रेरणा घेऊन मराठीत ‘लघुनिबंध’ म्हणजेच ‘ललितनिबंध’ हा प्रकार विकसित झाला. १९२७ मध्ये ना. सी. फडके यांनी काही लघुनिबंध लिहिले. हे लेखन ‘गुजगोष्टी’ म्हणून प्रसिद्ध झाले. त्यानंतर वि.स. खांडेकर, बा.भ. बोरकर, ना.मा. संत, कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे, दुर्गा भागवत, अनंत काणेकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, मधुकर केचे, श्री. ज. जोशी, दि. बा. मोकाशी, व्यंकटेश माडगूळकर, सरोजिनी वैद्य, विजय तेंडुलकर, रवींद्र पिंगे, कवी ग्रेस, आनंद यादव, श्रीनिवास कुलकर्णी अशी अनेक नावे सांगता येतील ज्यांनी ‘ललितगद्य’ हा प्रकार फार समर्थपणे हाताळलेला आहे. ललितगद्य, आठवणी-अनुभव, व्यक्तिचित्रणात्मक लेखन, प्रसंग चित्रणे, काव्यात्म गद्य, ‘मी’ चे समाजजीवन, कुटुंब जीवन, निसर्ग प्रेम, प्राणी प्रेम, विविध भौगोलिक प्रदेश, तेथील संस्कृतीची वर्णने करणारे प्रवासानुभव, प्रवास वर्णने या बाबींना वरील लेखकांनी आपल्या ललितगद्यात स्थान दिलेले आहे. डॉ. स्नेहल तावरे व डॉ. भास्कर शेळके यांनी या मराठी निबंध परंपरेच्या विकासातील प्रमुख अवस्था नोंदविलेल्या आहेत. ते लिहितात, *“निबंध परंपरेच्या विकासाच्या काही प्रमुख अवस्था दिसून येतात. १८७० पूर्वीचा प्राथमिक निबंध, चिपळूणकरी वळणाचा निबंध, परांजपे वळणाचा ललितयुक्त निबंध व त्यानंतर त्याच काळातील स्फूट लेख, केळकरी वळणाचा प्रसन्न शैलीतील ललितगुणयुक्त निबंध व त्यानंतर लघुनिबंध असे पाच छोटे-मोठे टप्पे १९८० पर्यंतच्या निबंधाचे मानले जातात. तरीही सामान्यपणे चार टप्प्यांत मानयचे तर एक निबंधमालापूर्व मराठी गद्यातील, दुसरी निबंधमालेच्या परिणामाने निर्माण झालेली, तिसरी आधुनिक काळातील ललितनिबंधाची वा लघुनिबंधाची आणि चौथी अवस्था म्हणजे लेखाची.”*[१] १९८५ नंतर हे निबंध वाङ्मय, ललितगद्य, ‘स्फुट लेख’ या स्वरुपात वर्तमानपत्रातून, नियतकालिकातून तसेच पुस्तकरूपाने लिहिले, वाचले जातांना आपण पाहतो.

****

लघुनिबंध, ललित गद्य याचे स्वरूप कसे असावे? या वाङ्मयप्रकाराची नेमकी लेखनशैली कशी असावी? रचना कशी असावी? याबाबत निश्चत असे सांगणे कठीण आहे. बऱ्याचदा वाचकाला लघुकथा आणि ललितगद्य यातील फरक करणे अवघड व्हावे इतके साम्य या दोन वाङ्मयप्रकारात असलेले दिसून येते. प्रसंगचित्रण, संवाद, पात्रचित्रणे यातही कमालीचे साम्य या दोन वाङ्मयप्रकारात दिसून येते. मात्र लघुकथा लेखनाचे निश्चित असे तंत्र आहे. तांत्रिकदृष्ट्या प्रसंग चित्रणातील निरगाठ-उकल, कलाटणी ही लघुकथेची महत्त्वाची बाजू या दोन साहित्यप्रकारातील सीमारेषा निश्चित करते. ना. सी. फडके यांनी ‘प्रतिभासाधन’ या

ग्रंथात ललित निबंधाच्या रचनेबाबत 'रचनेचा अभाव' हे ललित निबंध वाङ्मयप्रकाराचे महत्त्वाचे वैशिष्ट्य नोंदविलेले आहे. ते लिहितात, *"रचनेचा अभाव हादेखील त्याचा विशिष्ट गुण मानण्यात येतो. मनमोकळ्या संभाषणाच्या आविर्भावाने निबंध लिहावयाचा असे म्हटले की, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष, मुद्दे-प्रतिमुद्दे, प्रमाण-प्रतिप्रमाण इत्यादी जून्या निबंधाच्या रचनेची अंगे अयुक्त ठरलीच. अमुक एक सिद्धांत सिद्ध करण्याचा हेतू संपल्यावर पद्धतशीर मांडणीची अथवा बंदिस्तपणाची आवश्यकता राहणार कशी? मित्रांशी नर्म भाषण करताना आपण काय त्याची अवधानपूर्वक रचना करतो? बोलण्यावरून बोलणे सुरू होते आणि ते सुचेल त्या क्रमाने आपण बोलत जातो; नव्हे काय?... मग निबंध याच थाटाने लिहायचा म्हटल्यावर रचनेच्या कौशल्याचा प्रश्न अजिबात गौण ठरावा हे क्रमप्राप्तच होय. इतकेच काय, याही पुढे जाऊन असे म्हणण्याचा मोह होतो की, आधुनिक थाटाच्या निबंधाला रचनेची खटपट घातक ठरेल. या निबंधाला काव्यमय उद्गाराचीच उपमा समजण्यासारखी आहे; व ज्याप्रमाणे काव्यप्रकार जितका सहज तितका सुंदर त्याप्रमाणे निबंध ही जितका विस्कळीत व सहज असेल तितकी त्याची मनोज्ञता वाढेल. ताजेपणा आणि मुग्धपणा हे ललित निबंधाचे प्राणभूत गुण आहेत; आणि रचनेच्या खटाटोपाने त्याला शोभा येण्याऐवजी त्याचा मुग्धपणा व टवटवी मात्र नष्ट होईल. कृत्रिम प्रसाधनांनी नटलेल्या व वस्त्रालंकारांची काळजीपूर्वक रचना करून पुढे येणाऱ्या नटीपेक्षा घर्मबिंदूनी व भुरभुरू उडणाऱ्या केसांनी जिचे मुखमंडल शोभिवंत दिसत आहे व आपण कुणाच्या दृष्टीस पडत आहोत याचे भानही जिला नाही अशा शेतातल्या माचीवर उन्हात उभे राहून पाखरे हाकणाऱ्या किशोरी सारखे आधुनिक निबंधाचे सौंदर्य असले पाहिजे. रचनेची खटपट त्यात नसावी हेच योग्य."*[२] ना. सी. फडके यांनी लघुनिबंधातील रचनेचा सहजपणा कसा असला पाहिजे? याविषयी केलेले हे भाष्य लघुनिबंधांच्या सहज, सुंदर, हळुवार आणि काव्यात्म स्वरूपावर प्रकाश टाकणारे आहे. लघुनिबंधाचा जनक माँतेनच्या लघुनिबंधाचे सूत्र *"I am myself the subject of my book (माझ्या लेखनाचा विषय मीच आहे)"*[३] हे होते. मराठी लघुनिबंधकारांनी हेच सूत्र स्वीकारलेले दिसते. 'मी' ची अनुभूती हाच लघुनिबंधाचा महत्त्वाचा विशेष ठरतो.

लघुनिबंध कसा सुचतो याबाबत वि. स. खांडेकर 'पारिजात'च्या प्रस्तावनेत लिहितात, *"लघुनिबंध लेखकाच्या मनात प्रवेश करतो. तो त्याला गुदगुल्या करीत गमतीदार विचार, चमत्कृतीपूर्ण कल्पना, जीवनातील विसंगती सौम्यपणे सूचित करणारा प्रसंग, नाजूक तांबूस पालवी प्रमाणे एखादी साधी व गोड भावना लेखकाच्या व्यक्तीमत्वाला स्पर्श करून जाते आणि मग त्याच्या मनात लघुनिबंधाचे बीज रूजते."*[४] लेखकाच्या विविधांगी अनुभूतीने या बीजाचे वृक्षात रुपांतर होते. लेखकाची चिंतनशीलता, भावनाशीलता, त्याची निरीक्षणक्षमता, सौंदर्यदृष्टी, सामाजिक भान, निरागसत्व आणि त्याचा भाषिक अवकाश यावर या लघुनिबंधाचे यशापयश अवलंबून असते.

*****

**लतिका चौधरी यांचे ललितगद्य 'गवाक्ष'** :

लतिका चौधरी या सातत्यपूर्ण लेखन करणाऱ्या कवयित्री, लेखिका आहेत. त्यांच ललितगद्य 'गवाक्ष' हा ललितगद्य संग्रह डिसेंबर २०२० ला प्रकाशित झाला. त्यापूर्वी त्यांचे भाव सरोवर (२०१३) मराठी काव्यसंग्रह, नियतीना सूड (२०१४) अहिराणी काव्यसंग्रह, 'आकाश झुकलं' (२०१५) मराठी काव्यसंग्रह, 'गल्लीनी भाऊबंदकी' (२०१६) अहिराणी ललित, 'त्रिकोणातील वादळ पेलताना' (२०१६) मराठी कादंबरी, 'खानदेशी बावनकशी' (२०१९) अहिराणी ललित, 'चंद्राचा रथ' (२०१९) मराठी बालकाव्यसंग्रह, 'नियं आभाय' (२०२०) अहिराणी काव्यसंग्रह, 'मा' 'ती' (२०२१) मराठी काव्यसंग्रह, या त्यांच्या नऊ पुस्तकांमध्ये सहा काव्यसंग्रह, दोन ललितगद्य, आणि एक कादंबरी आहे यावरून आपल्या लक्षात येईल की लतिका चौधरी या मुळात कविमनाच्या लेखिका आहेत. एक संवेदनशील कवयित्री म्हणून त्यांची ओळख त्यांच्या साहित्यातून अधोरेखित होते.

‘गवाक्ष’ या ललितगद्याच्या सुरुवातीलाच त्यांनी लिहिलेली अर्पणपत्रिका लतिका चौधरी यांच्या संवेदनशील कविमनाची ओळख करून देणारी आहे. अर्पणपत्रिकेत त्या लिहितात, “आठवणीच्या गाभाऱ्यातली माणसे..., चोचीत दाणे देणारा बळीराजा..., मनाच्या अंगणी घिरट्या घालणारी पाखरे..., रेंगाळणारे संकल्प..., गर्भार आभाळ..., घर नावाचा स्वर्ग..., लाडला चिरंजीव शुभम..., अन् वादळालाच भिरकावून लावणाऱ्या, विश्वासरुपी दिव्य भव्य अक्षरांना... अर्पण.” (गवाक्ष अर्पणपत्रिका, पृ.क्र. १.) या अर्पणपत्रिकेप्रमाणेच त्यांच्या कविमनाची साक्ष त्यांच्या पहिल्याच लेखातून ‘आई समजणाऱ्या यंत्राच्या शोधाचे दीर्घकाव्य अन् कहाणी’ यामधुनही पटते. हा संपूर्ण लेख म्हणजे एक आडवी लिहिलेली कविताच. आईविषयीच्या भावना वैश्विक स्तरावर सर्वत्र सारख्याच असलेल्या आपणास दिसतात. आईचं प्रेम, वात्सल्य, तिचा त्याग, तिचा संघर्ष हा अनेक कवींनी, लेखकांनी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कवीसाठी ही आई कधी वासराची गाय असते, दुधावरची साय असते, लंगड्याचा पाय असते, गजबजलेलं गाव असते (फ. मु. शिंदे). लतिका चौधरी यादेखील आईचे हे पावित्र्य, मांगल्य आणि आईपण अधोरेखित करतात.

आईच्या तुलनेत ‘बाप’ मात्र कवितेत उपेक्षित राहिला. मुलांसाठी घराबाहेर पडणारा, जीव ओतून कष्ट करणारा, खस्ता खाणारा, मुले झोपेतून उठण्याच्या आधीच कामाला जाणारा आणि मुले झोपल्यावर रात्री उशिराने घरी येणारा बाप कवी-लेखकांच्या संवेदनशीलतेच्या चौकटीत कधी बसलाच नाही. असे म्हणतात की, मुली या अधिक संवेदनशील असतात. बापाशी लेकीचं अधिक जवळकीचे, प्रेमाचे, आपुलकीचे नाते असते. मुलाच्या तुलनेत लेक बापाला अधिक चांगलं समजून घेऊ शकते. परंतु साहित्यात ‘आई’ विषयीच्या कविता जशा लिहिल्या गेल्या, तशी कविता ‘बापाविषयी’ ना कोणत्या कवीने लिहिलेली ना कवयित्रीने. अभावाने काही मोजके कवी असतीलही; परंतु बापाच्या कवितेची दखल तशी घेतलीच गेलेली दिसत नाही. कारण बापाविषयीच्या भावना सर्वत्र सारख्याच दिसत नाहीत. काही बाप चांगले असतात, तर काही व्यसनाधीन, दारुडे. मुलांच्या हितासाठी त्यांना रागवणारा व प्रसंगी मारणारा बाप हा अनेकदा मुलांना खलनायकच वाटतो. त्याचा धाक, दरारा यामुळे आपुलकी, प्रेम निर्माण होण्याऐवजी बापाविषयीची भीतीच अनेक मुलांच्या मनात असते. त्यामुळे बापाचे प्रेमळ हळवे मन त्याच्या पुरुषी प्रतिमेमुळे आईसारखे सार्वत्रिक स्वरूपात समोर येत नाही. त्यामुळेच सर्वच काळात बाप उपेक्षित राहिला. अगदी दैवतांच्या मध्येही विठ्ठलाला ‘माऊली’ आईचीच उपमा दिली गेली. या बापाविषयीच्या मुलांच्या अनेक तक्रारी असतात; त्याला काही कारणे असू शकतीलही, पण मुले जेव्हा बापाच्या भूमिकेत जातात त्या वेळेला त्यांना बाप कळायला लागतो असे म्हटले जाते. लतिका चौधरी यांच्या ललितगद्यातून ‘बाटली सवे घरंगळत जाणारा आमचा बाप, मायेच्या दुष्काळाच्या झळा सोसणारी, राबणारी आमची माय’ (गवाक्ष, पृ.क्र. ४) अशा तुलनेतून हा बाप व्यक्त होतो. तुम्ही भेट दिलेल्या दुःखाचं घोंगडं मायनं खांद्यावर पेललं, अन् उन्हातलं झाड होऊन सूर्य डोक्यावर नाचवत, ‘चंद्र’ तुम्हाला देत राहिली.” (गवाक्ष, पृ.क्र. ४) अशी तक्रार लेखिकेची बापाविषयीची आहे. अशा शुष्क मनाच्या पटलावर बापाच्या व्यसन सुटण्याने उगवलेले आशेचे रोपटे मात्र वडिलांच्या अवेळी जाण्याने अल्पायुषी ठरले; याचं दुःख या बापाच्या लेकीला आहे. बापाच्या सोबत नसण्याने आणि कायमचेच नसण्याने आईलाच बाप म्हणून जगावं लागलं तरीही आईची बापाकडची ओढ तिच्यातील बापाची अपूर्णता दाखवणारी लेखिकेला वाटते. ती लिहिते,

शेवटी बाप हा बाप असतो, संसार रथाचे चाक असतो
डोक्यावरचे आभाळ कधी तर, पाठीवरची कौतुकाची थाप असतो
अथांग सागर बाप कधी तर, उसळणारी लाट असतो
मंदिराचा देव मायचा, काळजातल्या गाभाऱ्यातले वात असतो
अश्रू मायेचे जरी बोलती नेत्री, बाप दुःख मौनातच गात असतो
खळखळतो झरा जसा मायचा, बाप अंतरीच वाहत असतो

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 8, Issue 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

नसणं त्याचं फरफट मायची, असणं सार्थ करीत असतो (गवाक्ष, पृ.क्र. ५)

पहिल्या दोन्ही लेखांचा शेवट लेखिका 'मातृ देवो भव', 'पितृ देवो भव' अशा शब्दात करते. कुठलीही बापाविषयीची किल्मिषे मनात न ठेवता ही लेखिका बापाचे बापपण मान्य करते. व्यसनाधीन असूनही बापाच्याप्रति लेकीची असणारी ओढ आणि लेखिकेची मांगल्यावरील श्रद्धाच त्यावरून दिसून येते.

'शेतकरी राजा उठ' हा शेतकऱ्यांचा जगणं, भोगणं शब्दांकित करणारा लेख आहे. या पहिल्या तीनही लेखांचे एक वैशिष्टय सांगता येते; ते म्हणजे संवादात्मक शैली. पहिल्या लेखात आईशी, दुसऱ्यात वडिलांशी तर तिसऱ्यात या जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याशी लेखिका संवाद साधते. जगाचा पोशिंदा म्हणून मिरवणाऱ्या शेतकऱ्याची उपाशी अवस्था, त्याचे हिरवाईचे स्वप्न भंग करणारी गारपीट, अवर्षण, अन् कर्जाखाली दबलेली अवस्था, डोळ्यापुढे झालेला अंधार व त्यामुळे फाशीचा गळ व विहिरीचा तळ जवळ करणारा शेतकरी लेखिका उभी करते. त्याला हवे असतात धीराचे दोन शब्द त्याला हवे असतात कोणीतरी फक्त पाठीवर हात ठेवून लढ म्हणणारे. त्याला लेखिका तू 'बळीराजा' असल्याची आठवण करून देते. 'शिवाजीचा मर्द गडी तू' म्हणून साद घालते. बसलेले दिवस घर बांधत नाही हेदेखील आवर्जून सांगते. आम्ही सारे पाठीशी राहू, वेळोवेळी साथ देऊ अशी ग्वाहीदेखील देते.

'प्रणयी प्रपंच पारव्याचा' हा ललित लेख 'प्रतीकात्मक' आहे. प्राणी, पशू-पक्षी आणि माणसं यांचं जगणं जवळपास सारखंच असतं. नर-मादीचे एकत्र येणे, त्यांचे प्रेम गुंजन, प्रणयाराधन, गुजगोष्टी, पिल्लांना जन्म देणे, पिल्लांना पंख फुटले की त्यांनी आपापली दिशा शोधत आकाशात भरारी घेणे आणि पुन्हा नर मादीने दोघेच उरणे इथपर्यंत ठीक आहे. लेखिका लिहिते, "*सृष्टीवरच्या प्रत्येक सजीवाचे फक्त आकार-प्रकार, जगण्याचे वय, जात वेगवेगळी असते; मात्र त्यांचे प्रेम, जिव्हाळा, वंशवृद्धी, प्रणयभाव, राग, द्वेष, भीती, शत्रुत्व, जगण्यासाठीचा अट्टाहास सारखाच दिसून येतो. माणूस हा सृष्टीवरचा सर्वात बुद्धिमान प्राणी, पण माणसातील प्रवृत्ती जसे स्वार्थ, लुच्चेपणा, कृतघ्नता, पाशवी वृत्ती, नतभ्रष्टता, अन्याय, अत्याचार, बलात्कार करणारा 'स्त्री' ला फक्त मादी आणि मादीच समजणाऱ्या त्याच्या माणूसपणावर ही कुरघोडी करता येईल; इतकी प्रामाणिक प्राणी, पक्ष्यांची जात खूपच लोभस आहे एवढे नक्की.*" (गवाक्ष, पृ.क्र. ११) माणूस आणि पक्षी यामध्ये मग श्रेष्ठ कोण? बऱ्याचदा माणूसच पशुत्वाची हद्द ओलांडून जातो. त्याचा प्रतीकात्मक वेध लेखिकेने येथे घेतला आहे.

माणसाला आठवणींमध्ये आणि विशेषतः बालपणातील आठवणींमध्ये रमायला खूप आवडतं. बालपणीच्या निरागस मनाला भावलेलं भावसत्य लेखिका 'हिरवा कोपरा' या लेखातून मांडते. हिरवा रंग, हिरवं पान, हिरवळ, हिरवं हिरवंगार या शब्दांच्या नुसतं उच्चारण्याने ताजेतवाने होणारे मन बालपणीच्या हिरवळीच्या आठवणीत अलगद शिरते. अक्षय तृतीयेच्या गौराईच्या कलशाच्या भोवती अंकुरित होणाऱ्या गव्हाचा सृजन सोहळा अनुभवणारे लेखिकेचे मन विविधरंगी फुलझाडं, वेली यासारखं बहरत जाते. आणि नकळतच ते माणूस आणि झाड, वेली, फुले यांच्या जगण्यातील साम्य अधोरेखित करायला लागतं. मग लेखिकेला कुठलाही अहंकार, आखूडपणा न करता इंचाइंचाने वाढणारा कडुनिंब, बदाम, हेकट स्वभावाचा नारळाचे रोपटं, अल्लडपणे नाचत, हुंदडत वाढणारी मधुमालतीची वेल आणि स्वतः सारखीच साधी सरळ कसलाच हट्ट न करणारी लक्ष्मीवेल असल्याचा शुभ संकेत तिला जाणवतो. जास्वंद, दुधी चाफा, गुलमोहर, कढीपत्ता, लाजाळू, आंबा या सर्वच झाडांना लेखिका व्यक्तित्व बहाल करते. वृक्षांच्या या दुनियेबरोबरच पशुपक्ष्यांच्या दुनियेचेही लेखिकेला आकर्षण आहे. घराच्या अंगणातील पिवळया चिमणीचे घरटे, तिचे पिल्लांना जन्म देणे, घरट्यासाठीचा तिचा आक्रोश, सैरभैर होणे हे पाहून लेखिकेच्या मनाची झालेली सैरभैर अवस्था आणि तिला जाणवलेलं भावसत्य 'तिचं-माझं मातृत्व, एकच वेदना-तळमळ, जिवाची तडफड तीच होती.' असा साक्षात्कारी अभिप्राय लेखिका नोंदविते. या झाडांच्या, प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या दुनियेत निसर्ग नात्याचा एक ऋणानुबंध लेखिकेने अनुभविलेला आहे. हा ऋणानुबंध एवढा घट्टआहे की, न लावता उगवणारे

सुबाभूळही तिला ‘निंदकाचे घर असावे शेजारी’ या नात्याने जपावेसे वाटते. निसर्गाशी रममाण होणे, एकरूप होणे, समरूप होणे, दुःख-वेदना आपल्या पर्यंत पोहोचणे शक्य असल्याची लेखिकेला खात्री आहे.

बालपणीच्या आठवणीच्या हिंदोळ्यावर लेखिकेला आपला गाव आठवतो. गावांमध्ये गुण्या-गोविंदाने नांदणारे सर्व जाती-धर्माचे लोक आठवतात. सर्व जाती-धर्माचे सण, उत्सव, परंपरा, रूढी आणि त्यानिमित्ताने परस्परांमध्ये असणारा स्नेह, प्रेम, आपुलकी लेखिकेला आठवते. मात्र बालपणीची ही माणुसकीची श्रीमंती आज तिला समाजात गवसत नाही. जिकडे तिकडे स्वार्थ, लोभ, तिरस्कार, स्वकेंद्री वृत्ती याचेच प्रत्यंतर येते आणि लेखिकेला प्रश्न पडतो, *“आजची पिझ्झा बर्गर ची मिश्रणप्रिय व रुक्ष संस्कृती जुन्या पण सोन्यासारख्या संस्कृतीची बरोबरी करेल काय? असो. परिवर्तन हा काळाचा नियम आहे. पण नाती आणि नात्यातील ओलाव्यातला कोरडेपणा, रुक्षपणाला परिवर्तन म्हणता येईल?*

*ती गल्ली, मातीच्या घराच्या कच्च्या भिंतीच्या आडोशाला राहणारी प्रत्येक कुटुंब पक्क करण्याचा प्रयत्न करणारी, छोट्या घरात आयुष्य काढणारी, मोठ्या हृदयाची माणसे हरवलीत कुठे? शेजारच्यांचे सुख-दुःख आपले स्वतःचे मानून, गरजेच्या वेळी धावपळ करणारी आणि मानलेली नाती असूनही रक्ताच्या नात्यापेक्षा जिवाभावाने वागणारी नाती, माणुसकी त्यांच्यासोबतच धरणी मातेच्या कुशीत गाडली गेली का? बिघडलेल्यास दोन गोष्टी सांगून त्याला सुधारणं, संसाराला लावून, उघड्याला झाकणं ही तत्त्व अंगीकारून दारिद्र्यातही माणुसकीची, शेजारधर्माची श्रीमंती जोपासत, ‘जगा व जगू द्या’ शिकवणारी माणसे गेलीत कुठे?”* (गवाक्ष, पृ.क्र. १८)

‘पाऊस अंकुरलाय’ या लेखातून लेखिकेने पावसाविषयीच्या आपल्या आठवणी मांडलेल्या आहेत. ललित गद्यातील आठवणी, प्रसंगचित्रन आणि त्यांच्या मांडणीतील लालित्य या लेखांतून जाणवते. लेखिका लिहिते, *“ज्या वयात आपण पाऊस पाऊस खेळतो, तो पाऊस त्याच वयाचा असतो. ज्या प्रसंगात पाऊस पाहतो तो पाऊस त्या प्रसंगाचाच भाग बनून जातो. ज्या मुडमध्ये पाऊस धारा झेलतो, त्या तितक्याच जड किंवा हलक्या, आनंद लहरी निर्माण करणाऱ्या तर कधी बोचणाऱ्या असतात.*

*असा हा पाऊस.., बालपणीचा पाऊस.., आठवणीतला पाऊस.., हिरदातला पाऊस.., मनातला पाऊस.., नयनीचा पाऊस.., जीवनातला पाऊस.., कवितेतला पाऊस.., कथेतला पाऊस..!*

*पाऊस चंदेरी.., गुलाबी.., हिरवागच्च..! पाऊस बालपणीचा.., प्रेमाचा.., आयुष्याचा.., भोगलेला पाऊस आपण जगत असतो, अन् विविध नात्यात त्याला बघत असतो.”* (गवाक्ष, पृ.क्र. २०) हा लेख वाचून आठवणींच्या पावसात चिंब भिजण्याचा अनुभव वाचकालाही घेता येतो.

‘अभिसारिका’ हे लेखिकेच्या नेणीवेतील एक दीर्घ कथाकाव्य. खरेतर अर्धजाणीव आणि अर्धनेणिवेतील मनाची एक भावावस्था या कथाकाव्यातून जाणवते. एक स्त्री, एक नायिका, एक पत्नी, एक प्रेयसी, विवाहानंतरच्या सामाजिक जबाबदारीचं ओझं, पती-पत्नीचं नातं, अपेक्षा, वास्तव, अपेक्षाभंग, स्वत्वाचा शोध अशा विविध संदर्भांनी ही नायिका आपल्या समोर उभी राहते. निश्चित असा आदि, मध्य, अंत याचा ठाव मात्र वाचकाला लागत नाही. तरीही एक उत्सुकता शेवटपर्यंत ताणून धरण्यात लेखिका यशस्वी झालेली आहे. भारतीय समाज परिप्रेक्षात स्त्री मनाच्या विविध भावावस्था येथे लेखिकेने शब्दबद्ध केलेल्या आहेत. मनाच्या भावपटलावर संकल्प, विकल्प, अनुभूतीचे तरंग निर्माण व्हावेत असेच या लेखाचे स्वरूप म्हणता येईल.

‘घराशी एकरूप ती’ या लेखातून ‘दातृत्वाचा’ संस्कार पेरण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे. दिवाळी, अमावस्या दान मागायला येणाऱ्या बाईला दान दिल्यावर लेखिकेला होणारा आनंद हा शब्दातीत आहे. आपल्याकडे सारे काही असताना आणि आपण सुखात, समाधानात, आनंदात असताना इतरांनाही मदत केलीच पाहिजे; पण आपलं दुःख बाजूला ठेवून आपल्याला जे शक्य आहे ते इतरांना दिलं पाहिजे हा संस्कार रुजवणाऱ्या ‘वेलूचे व्यक्तिमत्व’ लेखिकेने इथे उभे केले आहे.

E-ISSN :
2348-7143
Oct-Dec 2021

'राजकन्या योगिनी' या लेखातील व्यक्तिचित्रणे हीदेखील संस्कार रुजविणारी आहेत. तत्त्वविचार, संस्कारांचे महत्त्व यातून एक सामाजिक प्रबोधनाचा विचार आहे. चांगल्या विचारांवरील व आचारांवरील निष्ठा आणि त्याचे मोल हे कोणत्याही काळात कमी होणार नाही हेच यावरून दिसून येते.

'आठवणीतील आखाजी' हा सण-उत्सवाच्या निमित्ताने भारतीय संस्कृतीतील सणांचे महत्त्व प्रतिपादन करणारा लेख आहे. भुलाबाई, गौराई, आखाजीची गाणी यातून परंपरेने चालत आलेल्या लोकसंस्कृतीच्या ठेव्याचे दर्शन घडते. मुलींचे अल्लड बालपण, खेळ, *"घरघर खेळणे, आट्यापाट्या, दोरी उड्या, फुगड्या, लंगडी, लपाछपी, भांडी-भांडी (भातुकलीचा खेळ), चौकट, कवड्या, कचकडे, बिट्या, बाहुला-बाहुली, नवरा-नवरी, गाण्याच्या भेंड्या, आन्हे, उखाणे."* (गवाक्ष, पृ.क्र. ४७) अशा विविध आठवणीत लेखिका रमते. गौराईच्या सण-उत्सवातील आनंद, आणि आखाजीची, गौराईची गाणी या साऱ्याच गोष्टी लेखिकेला भुरळ घालतात. आणि ते निरागस बालपण कुठेतरी हरवल्याची जाणीव होते. *"त्या मैत्रिणी, हसणे, खिदळणे, खेळणे, गट्टी फू, नाच-गाणी, रुसवा-फुगवा, जिव्हाळा, झोका, गाणी, ओव्या, सण-उत्सव, गौरी, गुलाबाई सारं....सारं फक्त आठवणीत उरलं. आधुनिकतेचा बुरखा पांघरून, मुखवटा चढवून, रुक्ष, निर्मम, कठोर हृदयाची माणसे पाहून गोंधळ होतो मनाचा की, ते सुख खरं, की हे सुख?"* (गवाक्ष, पृ.क्र. ४९) लेखिकेने विचारलेला हा प्रश्न वाचकालाही अंतर्मनात डोकवायला भाग पाडतो. संवेदनशील मनाला अस्वस्थ करून जातो. विचार करायला भाग पाडतो.

'प्रेम पर्व संपले...वेदनेच्या लाटेवरूनी' या लेखात सौ झोळ मॅडम यांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर श्री झोळ सरांचे एकाकीपण व नंतर हृदयविकाराने झालेला मृत्यू या संवेदनशील मनाच्या लेखिकेला हादरवणाऱ्या घटना, यथातथ्य वास्तवाची पार्श्वभूमी असलेल्या शोकात्म अशाच आहेत. माणसांचे अचानक निघून जाणे, मृत्यू पावणे माणसाच्या जीवनाची क्षणभंगुरता अधोरेखित करणारे आहे. जवळच्या माणसांचे असे निघून जाणे हे खूपच वेदनादायी असते, मग ती जवळची माणसे प्रेमाने, मनाने जवळ आलेली असोत की, रक्ताच्या नात्यांची असोत. 'चेतनामयी' मधून साहित्यावर प्रेम करणारा, लेखिकेला फोन करून प्रतिक्रिया देणारा आणि कमरेखाली संवेदना नसलेल्या परंतु जगण्याची प्रचंड इच्छाशक्ती व आत्मविश्वास असणाऱ्या चेतनचे अचानक संपणे हे देखील 'मनाला चटका लावणारे' आहे. दगडाच्या फटीतून जगण्याच्या उमेदीने वर आलेल्या हिरव्या गवताचे पिवळे होणे अश्या प्रतीकात्मक शब्दात लेखिका जीवनाचे हे आढळ सत्य मांडते.

'स्त्री उपटल्या मुळांची वेल....तरीही !' हा ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरुष तुलना' या दीर्घ निबंधाची आठवण व्हावी असा लेख आहे. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला दुय्यमत्व लाभलेले असले आणि तिला अबला, पराधीन, परावलंबी, समजले जात असले तरी नैसर्गिक दृष्ट्या खरी 'सबला' स्त्रीच आहे; याची जाणीव लेखिका या लेखातून करून देते. "दुर्वास ऋषींनी कुंतीला सूर्य मंत्र दिला. मंत्रात पुत्र(?) मिळवण्याचं सामर्थ्य होतं, मग त्याला नदीत सोडण्याची वेळ का आली? कुठे होतं त्याचं सामर्थ्य त्याला नाकारताना? सारं ममत्वाचं, स्त्रीत्वाचं दुःख तिला भोगावं लागलं. मंत्र सामर्थ्याने मुलं होतात...? ऋषी मंत्राचे सामर्थ्य, फळ....सूर्यपुत्र..! पण मग नंतरचे सोपस्कार? जबाबदारी? देवांच्या मंत्रांमध्ये जर एवढं सामर्थ्य होते, तर का नाही दिले त्याने पुरुषाला सुद्धा गर्भाशय?" (गवाक्ष, पृ.क्र. ६१) लेखिकेने विचारलेले हे प्रश्न विवेकवादी जाणिवा पेरणारे आहेत. वाचकाला अंतर्मुख करणारे आणि टोकदार सत्याला थेट भिडणारे आहेत. लेखिका या सर्व प्रश्नांची उत्तरे स्त्रीच्या सोशिकतेतच असल्याचे सांगते. ही सोशिकता स्त्रीच्या रक्तातच भिनलेली असते. 'सटवाईने तिच्या नशिबी अश्रूंची शिदोरी बांधलेली असते.', मात्र जेव्हा ती रौद्ररूप धारण करते, चंडी बनते, बंड करून उठते तेव्हा 'त्राही भगवान' करून सोडते हे स्त्रीचे सामर्थ्य ही लेखिका अधोरेखित करते. फुलण्यासाठी आणि फुलवण्यासाठी 'उपटल्या मुळांची रुजणारी वेल' ही स्त्री साठी वापरलेली सार्थ प्रतिमा लेखिकेच्या ललित लेखनाचे सामर्थ्य प्रकट करणारी आहे.

'सापुतारा सहल...आठवणीतली' हा प्रवास वर्णन, आठवणी अनुभव व्यक्त करणारा लेख त्यातील पद्यात्मक शैली, लेखिकेच्या कवयित्री असण्याचा प्रत्यय देणारा आहे. सापुताऱ्याचे नैसर्गिक सौंदर्य, हिरवे गालिचे, अल्हाददायक वातावरण आणि या सहलीच्या नियाजानाच्या अभावाने निर्माण झालेले नाट्य व शेवटी आनंददायी ठरलेली सहल असा अनुभव व्यक्त करणारा हा लेख आहे.

सर्वच कवी लेखकांना भुरळ घालणारा महिना म्हणजे श्रावण. 'श्रावणमासी हर्ष मानसी' म्हणणारे बालकवी असोत किंवा 'श्रावणात घननिळा बरसला' म्हणणारे मंगेश पाडगावकर असोत; सर्वांना श्रावण आवडतोच. 'नाचत आला श्रावण' या लेखात श्रावण आणि सण उत्सवांचे नाते लेखिकेने या लेखांतून मांडले आहे. जिवती पूजनाने सुरू होणारा श्रावण पोळा या सणाने निरोप घेतो. श्रावणाचे हे सौंदर्य आणि आनंद निसर्गाभिमुख होण्यातूनच अनुभवता येते. हा आनंद ग्रामीणतेत आहे. शेतकऱ्यांच्या सृजन सोहळ्यात आहे. लेखिकेला हा श्रावण काँक्रीटच्या भिंतीत बंदिस्त झालेला अन् कोरडाठक्क जाणवतो. बाहेरचं जग कोरडेठक्क असले तरी मनाच्या कोपऱ्यातील हिरवा श्रावण आठवून झुलूया अशी साद लेखिका येथे घालते अन् तिला जणू 'श्रावणच नाचत आल्याचा' भास होतो.

'शब्द वेडी दिशा' या लेखातून लेखिकेची एका तृतीयपंथी कवी सोबतची मैत्री आपल्यासमोर येते. दिशाच्या कार्यक्रमात बोलताना, *"दिशा जर ईश्वर आणि पुनर्जन्म असेलच, तर मी त्या ईश्वराला माझा पुनर्जन्म 'तृतीयपंथी' म्हणून मागेन."* (गवाक्ष, पृ.क्र. ७६) असं विधान लेखिका करते. तृतीयपंथीय हा देखील माणूस आहे, 'स्त्रीत्व' आणि 'पुरुषत्व' या दोघापेक्षाही वेगळी असणाऱ्या तृतीय पंथीयांना 'हिजडा' म्हटले जाते. समाजव्यवस्थेत 'हिजडा' ही एक शिवीच ठरते. समाजव्यवस्थेत 'तो' 'ती' चे शोषण करतो, 'ती' देखील 'ती' ची शत्रू असते त्यामुळे मानवतावादी आदर्श विचार असणारी तृतीयपंथीय 'दिशा' लेखिकेला मोठी वाटते. व लेखिका 'पुरुष' आणि 'स्त्री' या दोन्ही वर्गांना नाकारणारी भूमिका वरील विधानातून घेताना दिसून येते.

'श्राद्ध सत्कृत्य पांथेय' या लेखातून जिवंतपणी आपल्या वडिलांना जेवण न देणारा मुलगा व सून त्याच्या मृत्यूनंतर श्राद्ध घालतो. 'काव....काव' करुन कावळ्याने नैवद्य खावा म्हणून प्रयत्न करतात. या स्वार्थी, स्वकेंद्री वृत्तीतील विरोधाभास उपरोधिक शैलीने लेखिकेने मांडला आहे. या रूढी परंपरामागे असलेले पितृऋण स्मरण महत्त्वाचे असल्याचे लेखिका म्हणते. खानदेशातील आगारी टाकण्याची प्रथा आणि पितृ श्राद्धाच्या लोकपरंपरेचे दर्शन या लेखातून लेखिका घडवते. लेखिका लिहिते, *"माणसाला माणूस म्हणून जगायचे असेल, तर जडत्व सोडून भावपूर्ण अंतःकरण व सारग्राही बुद्धीने जगले पाहिजे; तरच माणूस जन्माचे सार्थक. अन्यथा किडे, माकोडे, जनावरेही जन्मतात व मरतात. पण त्यांचे श्राद्ध कोणी घालत नाही. माणसाचं श्राद्ध घालतात."* (गवाक्ष, पृ.क्र. ७९) हे भाष्य खूपच बोलके आहे. लेखिकेची माणसाला माणूसपणाची आठवण करून देण्याची भूमिका, आणि मानवतावादी दृष्टी त्यामागे आहे.

'ढगाळ काळीमा' हादेखील प्रतिकात्मक लेख आहे. आत्मचरित्रात्मक स्वर लाभल्याने ती 'प्रतिमा' स्पष्ट होते. आयुष्यात आलेले 'काळे ढग' शिक्षणाच्या सूर्योदयाने उजळून काढण्यासाठी सरसावलेली कणखर व विचारी 'स्त्री' लेखिकेच्या या आत्मकथनात्मक लेखातून भेटते. 'आईचे संस्कार', 'लहान भावाची चिंता' व 'जग काय म्हणेल?' याची भीती यामुळे आपल्या हातून कोणतीही चूक घडणार नाही याची खात्री असणारी ही मुलगी विचारांनी खूपच प्रगल्भ अशीच आहे. अर्थात ती स्वतः लेखिकाच आहे.

'प्रेमात पडाच,...पण,...स्वतःच्या !' हा लेख तरुण-तरुणींना आत्मभान देणारा लेख आहे. पैसा, श्रीमंती, प्रतिष्ठा, यापेक्षा माणसावर प्रेम करा. तुम्ही दिसायला कसेही असा, स्वतःवर प्रेम करा. अपयशाला घाबरू नका, प्रेमभंगाने डगमगू नका, सद्गुण, महत्त्वाकांक्षा, प्रयत्न आणि इच्छाशक्ती यामुळे यशाचा मार्ग सुकर होतो हा विचारांचा संस्कारच लेखिका या लेखातून देते.

'आरं बाप्पा...संकल्पाची झाली गझल' या लेखातून स्त्री असल्याने व विविध नातेसंबंधांच्या जबाबदारीच्या ओझ्याखाली दबली जाऊन 'स्त्री'च्या आवडी, छंद जोपासायचे राहून जातात ही खंत लेखिका व्यक्त करते. पण संकल्प केला आणि जिद्द बाळगली तर या साऱ्या जबाबदाऱ्यांमधूनही वेळ काढता येतो ही गोष्ट स्वानुभवाने लेखिका सांगते.

'सौंदर्य कुरूपतेतलं' या लेखात सौंदर्याची व्याख्या ही व्यक्तीपरत्वे वेगळी असते आणि सौंदर्य हे नेहमी attitude वर अवलंबून असते यावर सुंदर लालित्यपूर्ण शैलीत भाष्य लेखिकेने केलेले आहे. हे भाष्य विचार प्रवर्तक असेच आहे. स्त्री सौंदर्याच्या सर्व कल्पना या 'पुरुषी' दृष्टीकोनातून आलेल्या आहेत. पुन्हा त्यात व्यक्तीसापेक्षता आहे. त्यामुळे स्त्रीने 'आपण सुंदरच आहोत' याची स्वतःला खात्री द्यावी, स्वतःवर प्रेम करण्यातूनच ते येणार आहे. निरोगी शरीर व निरोगी मन हेच खरे सौंदर्याचे लक्षण आहे. असा वैचारिक सौंदर्य पेरणारा हा लेख आहे.

'Whats App ची आभासी दुनिया' हा व्हाट्सअप वरील आभासी मित्र, कवी, त्यांची कंपूशाही, प्रतिक्रिया, यासोबतच समाजमाध्यम म्हणून व्हाट्सॲपचा सकारात्मक फायदा याचा साधक-बाधक वेध लेखिकेने घेतलेला आहे. या व्हाट्सॲप, फेसबुक चे दुष्परिणाम लिहितांना लेखिका लिहिते, "बालमन, कुमारमन, तरुणवर्ग वास्तव कळण्याच्या आत आभासी मोहात भरकटत चालला आहे. पोरा-पोरींचे भावनांचे कुंवारपण राहिलेच नाही, हे केवढे दुर्दैव. त्याचे दुष्परिणाम भावी जीवनात होण्याची दाट शक्यता. वयात येण्याआधी म्हातारपण, रुक्षपणा, नैराश्य, नात्यातील कोरडेपणा येऊन जीवन आणि जगणे वैराण वाळवंट होणे निश्चित. व्हाट्सॲप फेसबुक मुळे पोरपोरी (ज्येष्ठ ही तरुण होतात) लवकर संपर्कात येतात. त्यामुळे अनैतिक संबंधातून घरातून पळून जाणे, लव मॅरेज घाईत करणे, तेवढ्याच लवकर संबंध तुटणे ही वाढलेले आहे, मानसिक वैचारिक प्रगल्भतेची उणीव म्हणून नातेसंबंध तकलादू झाले आहेत." (गवाक्ष, पृ.क्र. ९४-९५) समाजमनाला जाग आणणारा, समाजभान आणणारा हा लेख आहे.

'खळखळाट तेजोमय किरणांचा' हा देखील सकारात्मक दृष्टी देणारा लेख आहे. सुख आणि दुःख हे दिवस रात्री सारखं एकमेकांना लागून येतच असतं. 'सुख पाहता जवापाडे' दुःख पर्वताएवढे असेही म्हटले जाते मात्र *"ही दुःख, अपयश हे काही कायमस्वरूपी नसतंच. फक्त सकारात्मक विचारांची ऊर्जा हवी. तेजोमय किरणांचा खळखळाट हवा. मग ही दुःखे, अपयश, संकटे, नियती, दुर्दैव, पराजय, बदनामी, अफवा, अनिश्चिततेची भुतभोवरी साध्या केसालाही धक्का नाही लावू शकत माणसाच्या. कुठलीही लाट प्रचंड नसते. माणसाच्या धैर्यापेक्षा, मजबूतीपेक्षा मजबूत असं काहीच नसतं."* (गवाक्ष, पृ.क्र. ९७) ही तेजोमय अनुभूती लेखिकेने या लेखातून मांडलेली आहे.

'असाही मृत्यू' या लेखातून लेखिकेच्या संवेदनशील मनाचा प्रत्यय येतो. अरुणा शानभाग या परिचारिकेवर बलात्कार झाला व नंतर तिचा दुर्दैवी मृत्यू झाल्यावरही तिच्यावर अतिप्रसंग करणारा सोहनलाल वाल्मीकि न्यायालयाने दाखविलेल्या दयेमुळे मोकळा सुटला, या घटनेमुळे लेखिकेचे मन अस्वस्थ झाले. लेखिकेला हे भारतीय समाजमन बोथट झाले आहे असे वाटते. महापुरुषांच्या स्त्री सन्मानाचा आदर्श विचार आपण विसरलो आहोत. स्त्रीकडे फक्त 'मादी' म्हणून पाहिले जाते या सर्वांविषयीची चीड लेखिका व्यक्त करते. स्त्रीनेच 'चंडी' रूप धारण करावे असे आवाहन करते.

'माझा अविस्मरणीय प्रवास : 'पुस्तकाचे गाव भिलार भेट' व 'अविस्मरणीय प्रतापगड दर्शन' हे क्षेत्रभेटीवर आधारित असणारे लेख आहेत. प्रवासवर्णनाची शैली असलेले हे लेख लेखिका चांगले प्रवासवर्णन लिहू शकतात याची खात्री देणारे आहे. प्रस्तुत स्थळे लेखिकेच्या नजरेतून वाचकांना येथे अनुभवता येतात.

'भगतचा उतारा आणि देवीचं वारं' यातून श्रद्धा-अंधश्रद्धा व त्याचा ग्रामीण समाज मनावरचा पगडा यावर लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. आत्मकथनात्मक शैलीने मांडलेले प्रसंगचित्रणे, वाचकांची उत्सुकता शेवटपर्यंत टिकवून ठेवणारे आहेत. पात्रचित्रणे आणि प्रसंगचित्रणे, संवाद देखील वेधक आहेत.

'हे रूपगर्विते...भोगावती' यातून भोगावती नदीचे दृश्य वाचकांसमोर उभं राहतं. नदीच्या पात्रात खेळलेले खेळ लेखिकेला आठवतात. नदी जणू 'स्त्री'च आहे; या अविर्भावात 'रूपगर्विते' म्हणून नदीशी साधलेला संवादच लेखिका यातून मांडते. पूर्वीचे नदीचे विशाल रूप मात्र आता बदलले आहे. गावातील तिचे स्वरूप वेगळे आणि शहरातील वेगळे आहे. लेखिका लिहिते, "गाव माणसं बदललीत, तसा तूही रंग, रूप, आकार, लांबी, रुंदी, वेशभूषा, केशभूषा, बदल स्वीकारला शहाणपणानं. नवल याचं की नाकात नथ, कानात कुड्या, कर्णफुलं, गळयात चितांग, सर, बोरमाळ, दंडावर येल्या, वाकळया, मनगटावर गोटपाटल्या, कमरेला कमरपट्टा, पायात कल्ले, तोडे, पायाच्या बोटात मासोळया, जोडवे आणि कपाळावर सूर्याचं तेज असणार मोठं लालजर्द कुंकू रेखाटलेली, घट्ट नऊवारी पातळ, अन् चोळीतली अंगापिंडाने भरलेली, डोईवर पदरातली अशी अस्सल गावरान, ग्रामीणबाज जपणारी, गावाची घरंदाज नवयौवना आणि शहरातील आखूड, तोकडी, बोडखी, सुनी-सुनी वाटणारी, माणूस की बाई हा गोंधळ निर्माण करणारी पण काळासोबत चालणारी, धावणारी, पडणारी, उडणारी, आपले पंख पसरून आकाश कवेत घेणारी, अष्टपैलू, माणूस म्हणून धैर्याने जगणारी धाडसी बाई ही दोन्ही रूपं लीलया पेललली तू. कसं जमतं गं तुला इतकं समयोचित जगणं आणि भोगणं." (गवाक्ष, पृ.क्र. १२१-१२२) यातून लेखिकेचे शब्द सामर्थ्य, सूक्ष्म निरीक्षण दृष्टी, रूपकात्मक शैली आपल्या प्रत्ययास येते.

'विद्यार्थिनींना घडवते दुर्गा चंडी' म्हणून या लेखात महाविद्यालयातील मुलींना बसमध्ये छेडणाऱ्या माणसाला मुलींनी चांगलाच चोप दिल्याच्या प्रसंगाचे चित्रण ही वेधक झाले आहे. पुरुषी विकृतीला वेळीच लगाम घालण्यासाठी चौधरी मॅडम यांनी दिलेली शिकवण ही सर्वच तरुण मुलींसाठी, स्त्रियांसाठी नक्कीच प्रेरणादायी म्हणावी लागेल.

'कागद माझा मित्र की, मीच कागद' असा प्रश्नार्थक शीर्षकाचा शेवटचा लेख लेखिकेचे आत्मकथन आहे. अतिशय विपरीत परिस्थितीत जिद्दीने शिक्षण घेऊन उभ्या राहिलेल्या नायिकेची ही कहाणी संकट काळाला धैर्याने सामोरे जाण्यासाठी कोणालाही प्रेरणा देईल अशीच आहे. प्रचंड वाचन, अभ्यास व त्यामुळे यशाचे सोपान चढता आले. लग्न, सासर, पुरुषी अहंकार यामुळे कधी शिखरावरून खाली यावे लागले; तरी शेवटी जे मिळालं त्यात समाधान आहे. दहा पुस्तके एक्केचाळीस पुरस्कार, मान-सन्मान यांची प्रचंड ऊर्जा या लेखिकेला लाभली आहे, लाभत आहे. त्यामुळे ही लेखिका 'कागदी जीवनच माझी संजीवनी झाल्याचे म्हणते. कागद आणि लेखणी या मित्र-मैत्रिणींच्या सहवासात यशस्वी जीवन दाखवता आल्याच म्हणते. जगभराला हादरवणाऱ्या कोरोनाची झळ लेखिकेलाही बसली आहे. सख्या भावाचा दुर्दैवी मृत्यू पचवणं तिच्यासाठी अवघड आहे. कोरोना यौद्ध्यांविषयीचे लेखन आपले नैतिक कर्तव्य ही लेखिका मानते. उच्च मानवी मुल्यांवर श्रद्धा असलेली, विवेकी दृष्टी आणि सामाजिक भान असलेली ही लेखिका आहे. 'गवाक्ष' ला लिहिलेल्या पाठराखणीत अरुण फडके लिहितात, *"आपला भोवताल तरल आणि सूक्ष्म संवेदनांनी शब्दात रोवून, पेरून अनुभूतीच्या, निरीक्षणाच्या गाभाऱ्यातून उत्कटतेने येणारी तुझी शब्दकळा काळजाला स्पर्शून जाते. तुझ्या ओटीतला गर्भ आता जणू साक्षात ब्रम्हांड ! त्या गर्भार कळा अगदी साक्षात त्या निरंतर शक्तिरूप स्त्रीत्वाच्या अस्तित्व सिद्ध करणाऱ्या..! लतिका दी....तू फक्त अचंबित करतेस....तू नित्यनूतन असतेस...!"* लतिका दीं च्या ललित गद्याचे, त्यांच्या सृजनशीलतेचे उचित मूल्यमापन करणाऱ्या या खऱ्या सार्थ ओळी म्हणाव्या लागतील. लतिका दीं चे 'गवाक्ष' हे ललित गद्य '*शक्तिरूप स्त्रीत्वाचे अस्तित्व सिद्ध करणारे*', प्रखर स्त्रीवादी जाणीवा पेरणारे आहे.

या ललितगद्याला लिहिलेली प्रस्तावना मात्र पुरुषी विचारांची पाठराखण करणारी तर नाही ना? अशी शंका उपस्थित करण्यास वाव आहे. स्त्रीवादाची सूक्ष्म जाण असणारांनी पुढील विधान पाहावे, *"लेखिकेने*

*साकारलेले आदर्श मातृत्व प्रत्येक स्त्रीमध्ये असतेच असा नियम आणि अनुभव नसतो, जन्माला घातलेल्या मुलांना रस्त्यावर फेकणाऱ्या लाखो माता भारतात आहेत."* (गवाक्ष, प्रस्तावना पृ. क्र. VIII) असे जे विधान सबनिसांनी केलेले आहे ते मातृत्वाचा, स्त्रीत्वाचा अपमान करणारे नाही काय? उत्तम कांबळे यांनी सुनीलकुमार लवटे यांच्या मुलाखतीत दोन लाख अनाथ मुले रस्त्यावर फेकले जातात असा आधार सबनीस नेमका संदर्भ न देता घेतात, जरी हा संदर्भ खरा मानला तरी जी दोन लाख बालके अनाथ म्हणून रस्त्यावर सोडली जातात ती या पुरुषप्रधान व्यवस्थेमुळेच ही बाब ते सोयीस्कररित्या दुर्लक्षित करतात. त्यासाठी सर्वस्वी दोन लाख मातानाच एकतर्फी जबाबदार धरणे व उपरोक्त विधान करणे बेजबाबदारीचे नाही काय? तसेच लेखिकेच्या व्यसनाधीन बापाचा संदर्भ अपरिहार्यतेतून आल्याचे सबनीस म्हणतात आणि असा बाप सर्वांच्याच वाट्याला येत नसतो अशीही पुरुषवर्गाची बाजू ते घेतात व या विधानाच्या अगदी विरुद्ध टोकाचे विधान मातेच्या संबंधाने येते, मंगलमय मातृत्वाचा गौरव, सन्मान ते नैतिक कर्तव्य म्हणून करतात; तो अपरिहार्यतेचा भाग त्यांना वाटत नाही. बऱ्याचदा लेखकाची स्तुती करून त्याच्या विचारांना संपविण्याचा प्रयत्नही विरोधी विचारांच्या व्यक्ती वा गटाकडून होताना दिसतो. त्यानुषंगाने पुढील अभिप्राय जाणकारांनी अवश्य पाहावा, *"लतिका चौधरी या सुसंस्कृत लेखिका आणि मानवी मूल्यांना समर्पित महिला आहेत. त्यांची दृष्टी व्यापक व उदात्त विचारांनी भारलेली आहे. त्यांच्या भूमिकेत आधुनिकतेचा कट्टरपणा नाही. पुरुषांचा द्वेष नाही. पारंपारिकता आहे पण अंधश्रद्धा नाही. स्त्रीचे भोगलेपण आणि तिच्या सोशिकतेतून आलेली प्रगल्भता त्यांच्या लेखनाचा गाभा आहे. प्रेम, मांगल्य, निष्ठा, सौंदर्य, समर्पण या मूल्यांची पूजा बांधणारे हे लेखन महिलांच्या एका साहित्यविश्वात खान्देशची अस्मिता अधोरेखित करते."* (गवाक्ष, प्रस्तावना पृ. क्र. VIII) सबनीसांचा हा अभिप्राय स्त्रीवादी ललितगद्याला पुरुषी लेखणीने 'स्तुतीपर शब्दांनी' मर्यादित करण्याचा प्रयत्न तर नाही ना? अशी शंका उपस्थित करण्यास वाव देणारा आहे. विचारांची चळवळ चालविणाऱ्यानी स्तुतीपाठकांपासून सावध राहिले पाहिजे. स्त्रीच्या सोशिकतेपेक्षा तिची बलस्थाने तिच्या चंडी असण्यात आहे. आणि स्त्री चंडी झाली की ती बसमध्ये छेडणाऱ्या महाभागाला चोप देतेच असा अनुभव आहे. विद्यार्थीनींना घडविते, दुर्गा चंडी अशीच चौधरी मॅडम यांची ओळख आहे. उपरोक्त विधानात '*प्रेम, मांगल्य, निष्ठा, सौंदर्य, समर्पण या मूल्यांची पूजा बांधणारे हे लेखन*' असे सबनीस या लेखनाचे वर्णन करतात. खरे तर भोगलेपण, सोशिकता, प्रेम, मांगल्य, निष्ठा, सौंदर्य, समर्पण ही सर्वच मूल्ये पुरुषी अपेक्षेतून स्त्रीवर लादली गेलेली आहेत. लतिका चौधरींनी 'सौंदर्य कुरूपतेतलं' या लेखात स्पष्टच लिहिलंय, "सौंदर्याची कल्पना व्यक्तिपरत्वे वेगळी असते...सौंदर्य नेहमी attitude वर अवलंबून असते." (गवाक्ष, पृ. क्र. ८९) आणि लेखिकेचा attitude स्पष्टच आहे, ती लिहिते, "अरे..! कुरूपता आहे ना माझ्यात...! तापट आहे..,डोक्याने खऊटही तेवढीच. मुरवत बरोबर, नाही म्हणायला शिकली मी स्वार्थी जगात ! जहरी पण आहे. अस्मिता., विनयला कुणी मोडू पाहत असेल तर जहरी नागिणीचा फणा फुत्कारणं, प्रसंगी दंश करणंही जाणते. आणि आजच्या या स्वार्थी, मन मेलेल्या कलियुगात याची गरजही आहे." (गवाक्ष, पृ. क्र. ९२) या अर्थाने हे प्रखर स्त्रीवादी ललितगद्य म्हणता येईल. त्यामुळे 'गवाक्ष'ला एखाद्या स्त्रीवादी लेखिकेने / समीक्षेने प्रस्तावना लिहिली असती तर लतिका चौधरी यांच्या लेखणीला अधिक चांगला न्याय मिळू शकला असता असेही वाटून जाते.

आशय विषयाच्या बाबतीतही हे लेखन केवळ *'महिलांच्या साहित्यविश्वात'* आणि *'खानदेशची अस्मिता अधोरेखित करण्यापुरते'* मर्यादित करता येणार नाही. कारण या ललितगद्याची मुळं आशय-विषय आणि रचनातंत्राच्या बाबतीत पूर्वसुरींशी घट्ट नाळ जोडून आहेत. लघुनिबंधाचा जनक माँतेनच्या लघुनिबंधाचे सूत्र *"I am myself the subject of my book (माझ्या लेखनाचा विषय मीच आहे)" हेच* सूत्र लतिका चौधरी यांनी स्वीकारलेले आहे. यातील प्रातिनिधिक स्त्री खानदेशातील असली तरी, केवळ खानदेशी स्त्रीत्वाची पताका

E-ISSN : 2348-7143
Oct-Dec 2021

फडकाविणारी नाही तर स्त्रीकडे ‘मादी’ म्हणून पाहणाऱ्या वैश्विक पुरुषी अहंकाराने पछाडलेल्या मनोवृत्तीचा बुरखा फाडणारे ‘ललितगद्य’ म्हणून ‘गवाक्ष’ या ललितगद्याची दखल घेतली जाईल. आशय-विषयासोबतच लतिका दीं ची प्रतीकात्मक शैली, त्यांचे शब्दसामर्थ्य व त्यातील लालित्य, रचनेचा सहजपणा फडके-खांडेकरांच्या विवेचनातील ललितगद्य रचनेची अपेक्षापूर्ती करणारे आहे. त्यामुळे मराठी ललितगद्याच्या इतिहासात ‘गवाक्ष’ची दखल घेतली जाणे अपरिहार्य ठरेल यात शंका वाटत नाही.

**गवाक्ष (ललित गद्य)**
**लेखिका : लतिका चौधरी**
**दिशोत्तमा प्रकाशन, नाशिक**
**प्रथम आवृत्ती : २६ डिसेंबर २०२०**
**पृष्ठ संख्या : १४८**
**किंमत : रु. १८०/-**

**संदर्भ सूची :**

१. तावरे (डॉ.) स्नेहल व शेळके (डॉ.) भास्कर, विचारधारा, लीलावती प्रकाशन अहमदनगर, प्र. आ. जून २०१५, पृ. क्र. ६-७.
२. फडके ना. सी. - प्रतिभा साधन, देशमुख आणि कं. पब्लिशर्स प्रा. लि. पुणे, आवृत्ती सातवी, जानेवारी १९६०, पृ. क्र. २१६-२१७.
३. खांडेकर वि. स. - पारिजात, खंड १., कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे, १९४९, प्रस्तावना पृ. क्र. १६
४. तत्रैव - पृष्ठ २६.

RESEARCH JOURNEY